वासुदेव मेघश्याम निखार्गे वि.
अनंत पुंडलिक निखार्गे व.२४

## निशाणी क्रमांक ७६ वरील आदेश

१. प्रस्तुतच्या अर्जाद्वारे वादी यांनी मयत प्रतिवादी क्र.१ चे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी विलंब माफ होवून मिळणेसाठी केलेला आहे.

२. वादीच्या मते, वादीच्या मते, सदर दाव्यातील प्रतिवादी क्र.१ श्री. अनंत पुंडलिक निखार्गे हे दिनांक २२/०५/२०२१ रोजी गांव मौजे वेंगुर्ला, ता. वेंगुर्ला येथे मयत झाले आहेत. प्रतिवादी क्र.१ हे मयत झालेनंतर कोरोनाच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या मृत्यूचा दाखला वेळीच उपलब्ध न झाल्यामुळे प्रस्तुत दाव्याचे कामी त्यांचे कायदेशीर प्रतिनिधी मुदतीत सामील करता आलेले नाहीत. प्रतिवादी यांचे कायदेशीर प्रतिनिधी मुदतीत सामील न करण्यामागे वादींचा कोणताही निष्काळजीपणा नव्हता व नाही. प्रतिवादी क्र.१ यांचे कायदेशीर प्रतिनिधी अभिलेखावर दाखल करणेस विलंब झालेला आहे. त्यामुळे वादीने मयत प्रतिवादी क्र.१ श्री. अनंत पुंडलिक निखार्गे यांचे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी झालेला विलंब माफ होवून मिळणेकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

३. वादीतर्फे विधिज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला.

४. प्रतिवादी क्र. १(अ) ते १(क) यांनी म्हणणे दाखल केलेले नाही, परंतु प्रतिवादीतर्फे विधिज्ञ यांनी युक्तीवाद करुन प्रस्तुत अर्जास आक्षेप घेतला आहे.

५. अर्ज व अभिलेखाचे अवलोकन केले. सदरचा दावा वादीने प्रतिवादींविरुध्द दावा मिळकतीचे व दावा इमल्याचे सरस निरस मानाने धडेवाटप होऊन पृथक कब्जा मिळणेकरीता दाखल केलेला आहे. प्रस्तुत अर्जाच्या पुष्ठयर्थ वादीने आपले प्रतिज्ञापत्र प्रस्तुत अर्जासोबत अभिलेखावर दाखल केलेले आहे. दाव्याचा निकाल गुणदोषावर

लागणेसाठी मयत प्रतिवादी क्र.१ अनंत पुंडलिक निखार्गे यांचे वारस अभिलेखावर घेणे गरजेचे आहे. त्यामुळे नैसर्गिक न्यायतत्वाच्या आधारे वादी यांचा सदरचा अर्ज मंजुर करणेस कोणतीच हरकत दिसून येत नाही. त्यामुळे मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज मंजुर करणेत येत आहे.

२. मयत प्रतिवादी क्र.१ यांचे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी झालेला विलंब रक्कम रूपये २००/- (रु.दोनशे मात्र) इतका खर्च आकारुन माफ करणेत येतो.

(आदेश खुल्या न्यायदालनात जाहीर.)

KUMBHAR RANJANA GOVIND
Digitally signed by KUMBHAR RANJANA GOVIND
Date: 2026.02.27 18:06:45 +0530

दिनांक- २६/०२/२०२६ (श्रीमती आर. जी. कुंभार)

ठिकाण- सावंतवाडी सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),

सावंतवाडी.